संगतकार ते संगीतकार

'सोलो' सारंगीवादक पंडित रामनारायण

"द सारंगी रिमेन्स नॉट ओन्ली द मोस्ट ऑथेन्टिक अँड ओरिजिनल इंडियन इन्स्ट्रुमेन्ट बट दि ओन्ली वन विच मोस्ट पॉइंग्नंटली अँड इन दि हँड्स ऑफ रामनारायण मोस्ट रिव्हीलिंगली एक्स्प्रेसेस द व्हेरी सोल ऑफ इंडियन फीलिंग्ज अँड थॉट." विसाव्या शतकातील महान संगीतकार आणि व्हायोलिनवादक येहुदी मेन्युहीन यांनी सारंगीवादक पं. रामनारायण यांच्याविषयी हे गौरवोद्‌गार काढले आहेत. भारतीय संगीताशी निगडित असलेल्या भावनांच्या आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे आदर्श माध्यम म्हणजे रामनारायणजींची सारंगी असे येहुदी मेन्युहीन मानतात. सारंगी या अस्सल भारतीय वाद्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेऊन ठेवणारे वादक म्हणून पं. रामनारायण यांच्या कामगिरीची संगीताच्या इतिहासात नोंद झाली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे वादक म्हणून आपल्याकडे सरोदमध्ये उस्ताद अली अकबर खाँ यांचे तर सतारवादनात पं. रविशंकरांचे नाव ज्याप्रमाणे घेतले जाते तितक्याच आदराने पं. रामनारायण यांचे नाव सारंगीवादक म्हणून घेतले जाते. या महान संगीतकाराच्या वयाला ७५ वर्षे नुकतीच पूर्ण झाली. त्या निमित्ताने त्यांची अमृतमहोत्सवी मैफल बुधवार, १३ फेब्रुवारी रोजी नेहरू सेंटरमध्ये संध्याकाळी साडेसहा वाजता आयोजित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, संगीतकार नौशाद, साहित्यिक अशोक वाजपेयी आणि दिलीप चित्रे, ज्येष्ठ पत्रकार विश्वनाथ सचदेव वगैरे मान्यवर या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.



रामनारायण हे मूळचे राजस्थानातील उदेपूर या शहरातील. वडील नाथूजी बियावत यांनी त्यांना सुरुवातीचे धडे दिले. गंगा गुरू नावाच्या एका आध्यात्मिक साधूने त्यांच्या घरात एक सारंगी ठेवून दिली होती. ती पाहून रामनारायण यांचे सारंगीवर जे प्रेम बसले ते आजतागायत कायम आहे. 'सारंगी' हे राजस्थानातील लोकसंगीतातून निपजलेले वाद्य आहे. या वाद्याचा नाद मानवी आवाजाच्या गुणधर्माशी नव्व्याण्णव टक्के जुळणारा आहे. हे वाद्य साथसंगतीचे वाद्य म्हणून विकसित झाले. पूर्वी सारंगीच्या साथीवर गायक गात. हार्मोनियम हे पाश्चात्य वाद्य आल्यानंतर आणि सामाजिक सुधारणांच्या झपाट्यात सारंगीचा ऱ्हास होऊ लागल्यानंतर सारंगीवादक कमी होऊ लागले. रामनारायण यांनी पं. कृष्णराव शंकर पंडित, ओंकारनाथ ठाकूर, पं. फैयाझखाँ, उस्ताद अमीरखाँ, उस्ताद बडे गुलाम अली खाँ वगैरे दिग्गज गवयांना संगत करीत असताना संगीताचा आणि विविध शैलींचा बारकाईने अभ्यास केला.

"मी लाहोर रेडिओवर १९४५ साली सारंगीवादक म्हणून होतो. तिथे कित्येक बडे गवई होते. आशिक अली, उम्मीद अली, भाईलाल, माझे गुरू वहीदखाँसाहेब! कितीतरी नावे घेता येतील. शिवाय इथून येणारे गंगूबाई, हिराबाई, सुरेशबाबू, रोशनाआरा बेगम, बेगम अख्तर वगैरे कलावंत! सर्वांच्या बरोबर मी साथ केली," असे ते जुन्या स्मृतींना उजाळा देत सांगतात.आकाशवाणीवरील नोकरीच्या निमित्ताने रामनारायण यांचे फाळणीपूर्व काळात लाहोरला वास्तव्य झाले. लाहोर हे त्या काळात हिन्दुस्थानी संगीताचे प्रमुख केंद्र होते. डॉ. अशोक रानडे सांगतात

सारंगीवादनाची पूर्वी नायकिणीच्या कोठीशी सांगड घातली जात असे. या वाद्याच्या नादाचे अध्यात्मीकरण करण्याची नितांत गरज होती. सारंगीच्या सुंदर नादाचे अध्यात्मीकरण करण्याचे प्रयत्न करण्यात पंडित रामनारायण यांचे महत्वाचे योगदान आहे. एकदा अमीरखाँसाहेबांबरोबर संगत करीत असताना एक क्षण असा आला की आपल्याला जे काही सांगायचे आहे ते आपण व्यक्त करावे असे पं. रामनारायण यांना प्रकर्षाने वाटले. तो त्यांच्या आयुष्यातील एक क्रांतिकारक क्षण होता. त्या क्षणी त्यांनी ठरविले की आता आपण संगतकार म्हणून न जगता 'संगीतकार' म्हणूनच जगायचे.

त्याप्रमाणे मुंबई-पुण्याकडल्या गायकांनाही 'लाहोर रेडिओ'चे प्रचंड आकर्षण होते. कारण त्या काळात अत्यंत आक्रमक, चमकदार आणि रंगतदार अशी पंजाबी ढंगाची गायकी त्या रेडिओ स्टेशनवरून प्रसृत होत असे. लाहोर रेडिओ स्टेशनने एका अर्थाने आपल्याला घडविले असे रामनारायण म्हणतात. "तिथले स्थानिक गवईच अत्यंत तयार होते. आशिक अली, इनायतीबाई डेरूवाली याशिवाय हिन्दुस्थानातून इतर ठिकाणांहून येणारे गायक-कलावंत. सर्वांबरोबर वाजवून मी गाण्यातले बारकावे टिपू शकलो." आपले एकल (सोलो) वादन विकसित करताना हे सर्व ज्ञानकण त्यांना उपयोगी ठरले.

फाळणीनंतर ते दिल्लीत स्थायिक झाले. त्यांचे बंधू पं. चतुरलाल हे प्रख्यात तबलावादक होते. काहीही झाले किंवा कितीही विपरीत परिस्थिती उद्‌भवली तरी सारंगीवादकाचा पेशा आपण सोडणार नाही अशी जिद्द त्यांनी दाखवली. अमीर खाँ, बडे गुलाम अली खाँ, अब्दुल करीम खाँ हे एकेकाळचे सारंगीवादक. पण पुढे त्यांनी आपला पेशा बदलला. साथसंगत पुष्कळ वर्षे केल्यानंतर, स्वत:कडे आता दुय्यम भूमिका घेऊन चालणार नाही, असे रामनारायण यांच्या लक्षात आले. एकदा तोडी राग सुरू होता. आपणही गवयाच्या तोडीस तोड या रागात काही ऐकवू शकतो, पण आपल्याकडे दुय्यम भूमिका असल्यामुळे ते करता येत नाही हे लक्षात येता रामनारायण यांच्या डोळ्यासमोर प्रकाशाचे नवीन दालन चमकले. आपण यापुढे एक वादक म्हणूनच जगायचे असा त्यांनी निर्धार केला. त्यांना नाव आणि कीर्तीही नंत मिळाली. या सर्व यशामागे त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती आहे.

एकदा अमीरखाँसाहेबांबरोबर संगत करीत असताना एक क्षण असा आला क आपल्याला जे काही सांगायचे आहे ते आपण व्यक्त करावे असे रामनारायण यांन प्रकर्षाने वाटले. तो त्यांच्या आयुष्यातील एक क्रांतिकारक क्षण होता. त्या क्षणी त्यांनं ठरविले की आता आपण संगतकार म्हणून न जगता 'संगीतकार' म्हणूनच जगायचे.

तेव्हापासून पं. रामनारायण एकल सारंगीवादनाचे (सोलोवादन) कार्यक्रम करू लागले. या वाद्याचा आणि त्यांच्या वादनाचा प्रभाव इतका जबरदस्त पडला की, केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही त्यांचे नाव गाजू लागले. सारंगीवर त्यांचा गज ज्या गतीने फिरतो, ते पाहून येहुदीसारखा अव्वल दर्जाचा व्हायोलिनवादकही स्तिमित झाला. एकल सारंगीवादन करणारे गुलाम साबीर खाँ किंवा बुंदू खाँसाहेब हे एकलवादनातील पूर्वसुरी होते. रामनारायण यांना आपले कर्तृत्व दाखविण्यासाठी संपूर्ण जगाचे विस्तीर्ण कार्यक्षेत्र लाभले.

सारंगीवादनाबाबत तसेच आपल्या कामगिरीविषयी बोलताना पं. रामनारायण म्हणतात की "सारंगीच्या सुंदर नादाचे अध्यात्मीकरण करण्याचा प्रयत्न मी केला". या वाद्याबरोबर पूर्वी नायकिणीच्या कोठ्याची सांगड घातली जात असे. या वाद्याच्या नादाचे अध्यात्मीकरण करण्याची नितांत गरज होती. रामनारायण यांनी आपली कन्या अरुणा नारायण कल्ले यांना तसेच नातू हर्ष याला शिकविले आहे. १३ तारखेला हे दोघेही रामनारायण यांच्याबरोबर वाजविणार आहेत. वासंती श्रीखंडे ही युवा कलाकारही त्यांची शिष्या आहे. रामनारायण यांनी सारंगीवादनाचे तंत्र तर विकसित केलेच; त्याशिवाय सारंगीचा नाद अधिकाधिक उठावदार बनविण्याच्या दृष्टीनेही कार्य केले.

या नादमाधुर्यामुळेच चित्रपटसंगीतात त्यांच्या सारंगीचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. नौशाद यांनी 'दो हंसोंका जोडा' किंवा 'नैन लड गयी है'सारख्या गाण्यांकरिता सारंगी वापरलीच. पण रोशन, ओ. पी. नय्यर, शंकर-जयकिशन वगैरे संगीत दिग्दर्शकांनीही रामनारायण यांच्या सारंगीचा मुबलक प्रमाणात वापर केला. चित्रपटांसाठी वाजवताना "मैने अपने आपको छुपाया नहीं" असे रामनारायण अभिमानाने सांगतात. संगीताचे वेगाने होत जाणारे बाजारीकरण आणि संगीतातील उच्च मूल्यांची होणारी घसरण यामुळे रामनारायण व्यथित असतात. "पारंपरिक मूल्ये फार महत्त्वाची आहेत. कारण त्यात सौंदर्यतत्त्व दडलेले आहे. पारंपरिक म्हणजे जुनाट नव्हे. संगीतातील कस आणि सत्त्व टिकविणाऱ्या परिमाणांबद्दल मी बोलतो आहे. मी आयुष्यभर कोणतीही तडजोड न करता ही परिमाणे सांभाळली आहेत. ही मूल्ये टिकविण्याची शक्ती मला लाभो एवढीच प्रार्थना मी या प्रसंगी करतो," असे हा थोर सारंगीवादक विनम्रपणे म्हणतो. पं. रामनारायण यांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी सदिच्छा संगीतरसिक त्यांच्या अमृतमहोत्सवप्रसंगी व्यक्त करतील यात शंका नाही.

■ अमरेन्द्र धनेश्वर